**Visit to Bahinabai Chaudhari Memorial Trust.**

# कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या स्मृतींना काव्यातून दिला उजाळा

## नूतन मराठा महाविद्यालयाचा उपक्रम, कवितांचे मर्म उलगडले

**प्रतिनिधी** | जळगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र नामविस्तार दिनानिमित्त नूतन मराठा महाविद्यालयात बहिणाबाईंच्या स्मृतींना काव्यातून उजाळा देण्यात आला. मराठी विभागाच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम घेण्यात आला.

इंग्रजी विभागाच्या प्रा. डॉ. इंदिरा पाटील अध्यक्ष म्हणून तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. ललिता हिंगोणेकर व्यासपीठावर उपस्थित होत्या. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कविवर्य ना. धों. महानोर, ज्येष्ठ विचारवंत हरी नरके आणि ज्येष्ठ लेखिका अंबिका सरकार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. ललिता हिंगोणेकर यांनी वढाय, चंचल, मोकाट, लहरी, जहरी, पाखरू, चपळ, खाकसाचा दाणा अशा मनाच्या अनेक शृंखला सहज सोप्या भाषेत सांगणाऱ्या अशिक्षित बहिणाबाई अत्यंत बुद्धिमान मनोविश्लेषक तज्ज्ञ वाटतात असे नमूद केले. अनेक तत्त्वचिंतनात्मक कवितेतून त्या जीवनाचं तत्त्वज्ञान शिकवून जातात म्हणूनच विद्यापीठाला त्यांचं नाव देऊन गौरवण्यात आले ही समस्त महिला आणि खान्देशवासीयांसाठी अभिमानास्पद बाब आहे असे त्या म्हणाल्या. डॉ. इंदिरा पाटील यांनीही त्यांच्या कवितांचे मर्म उलगडून सांगितले.



जुने जळगावातील चौधरीवाड्याला भेट देताना नूतन मराठाचे विद्यार्थी व प्राध्यापक.

### चौधरीवाड्याला दिली भेट

महाविद्यालयातील कार्यक्रम झाल्यानंतर बहिणाबाई चौधरी यांचे सासर असलेल्या जुने जळगाव येथील चौधरी वाड्यातील 'बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट'ला विद्यार्थ्यांना घेऊन प्रत्यक्ष भेट देण्यात आली. तेथे बहिणाबाईंचे नातू अशोक चौधरी यांनी बहिणाबाई वापरत असलेल्या वस्तूंबद्दल ओळख करून दिली. सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. रत्नाकर कोळी यांनी केले. आभार प्रा. स्वाती कोळी यांनी मानले. प्रा.राकेश गोसे यांनी परिश्रम घेतले.